D:\APA-2021\Letter 2021.doc

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ


कृषि नगर, वसमत रोड,परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा : विद्यापीठ परिपत्रक क्र.अेपीअ-१, दि.५.७.२०१९, दि.३१.७.२०१९ व दि. १०.२.२०२०.

**क्र.२०२१/कॅस यादी/प्र.क्र. ११७७/आस्था-१** / 2407 **दिनांक : १२.७.२०२१**

## परिपत्रक

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठा अंतर्गत पात्र शिक्षक वर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना कॅस अंतर्गत वेतनश्रेणी मंजुर करण्याकरीता संदर्भीय परिपत्रकान्वये प्रस्ताव मागविण्यात आले होते.

तसेच शासन पत्र दिनांक २०.७.२०१९ अन्वये दिनांक ३१.१२.२०१८ पर्यत अनिवार्य असलेले प्रशिक्षण पुर्ण केलेल्या शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांना देय दिनांकापासून कॅस अंतर्गतचा लाभ मंजूर करण्याबाबत सुचित केले होते त्यानुसार कॅस अंतर्गत मंजूर केलेल्या लाभाची दिनांक बदलून मिळण्याबाबतचे प्रस्ताव सुध्दा प्राप्त झाले होते.

उपरोक्त प्राप्त प्रस्तावाची तपासणी/पडताळणी करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर पडताळणी/तपासणी समिति गठीत करण्यात आली होती. सदर समितीने तपासणी/पडताळणी करून अहवाल सादर केला आहे.

कॅस अंतर्गत पायरी १ ते २ व पायरी २ ते ३ चे अहवाल स्क्रिनींग-कम-इव्हॅल्यएशन समिती समोर ठेवण्यात आले होते. स्क्रिनींग-कम-इव्हॅल्यएशन समितीने प्रस्तावाच्या तपासणी अंती पात्र शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांना कॅस अंतर्गत वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबतच्या दिनांकाची शिफारस केली आहे.

तसेच कॅस अंतर्गत पायरी ३ ते ४ चे अहवाल विभागीय पदोन्नती समिती समोर ठेवण्यात आले व त्यांनी पात्र शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांची मुलाखत घेऊन त्यांना कॅस अंतर्गत पायरी ३ ते ४ ची वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबतची शिफारस केली आहे.

सदर शिफारशींनुसार आदेश निर्गमित करण्यापुर्वी डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला विद्यापीठाच्या धर्तीवर कार्यकारी परिषदेत मान्यता घेण्याबाबत मा.कुलगुरू महोदय यांनी सुचीत केले आहे. तत्पुर्वी कॅस अंतर्गत वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबतच्या दिनांकाबाबत संबंधीत अधिका-यांचे काही आक्षेप/ तक्रारी असल्यास, त्यांची बाजू मांडण्याकरीता सदर यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर यादीमध्ये प्रस्तावीत केलेल्या कॅस मंजूरीच्या दिनांकाबाबत काही आक्षेप असल्यास सदर यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत, ( दिनांक १९.७.२०२१ पुर्वी ) संबंधीताने त्यांचे आक्षेप/तक्रारी लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासह योग्य माध्यमाद्वारे कुलसचिव, वनामकृवि, परभणी यांच्या कडे सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

**सोबत : यादी.**

१२/७/२१

डॉ.धिरजकुमार रा.कदम

**कुलसचिव**

प्रत :

१) प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देवून निर्देशीत करण्यात येते की, सदर परिपत्रक व संलग्न केलेली प्रपत्रे विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

२) मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.